# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/09/2023 (शुक्रवार) दुपार


---

### जबरी संभोग

**१) पो.स्टे. रामटेक :–** दिनांक २८/०८/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक २९/०८/२०२३ चे ००/०० वा. दरम्यान पिडीत मुलगी व **आरोपी नामे– गणेश गंगाधर धुर्वे, वय २० वर्ष** हे एकाच गावचे असुन ते एकमेकांना ओळखतात यातील पिडीत मुलीची आईची प्रकृती बरी नसल्याने उपचार रामटेक येथिल दवाखान्यात भर्ती होती. पिडीत हिचे वडील तिच्या आईला टिफिन नेवुन देण्यासाठी गेले असता पिडीत हिच्या घराशेजारी राहणारा तिचा चुलतभाऊ व आरोपी हे तिच्या घरी आले व पिण्यासाठी पाणी मागितले पिडीत हीने त्यांना पिण्यासाठी पाणी दिले व पाण्याचा गडवा आणुन, गडव्यामध्ये पाणी वाचले असल्याने, पिडीतेने ते पाणी पिल्याने तिला चक्कर आली ती बेडवर झोपली असता आरोपीने तिच्यावर बलात्कार केला व व्हिडीओ मोबाईलमध्ये काढुन पिडीतेला दाखवुन कोणाला सांगितल्यास व्हिडीओ वायरल करेल अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे आरोपीविरूद्ध कलम ३७६ (२) (एन), ५०६ भादंवी सहकलम ४, ६, ८, १२ पोक्सो कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि स्वाती यावले मो. नं. 9011655284 या करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी :–** यातील **आरोपी नामे– हर्षद प्रकाश मांढरे, वय १९ वर्ष, रा. ता. तुमसर जि भंडारा** याने दिनांक ०१/०८/२०२३ रोंजी नागदेवता मंदीर निंबा पहाडी येथे जावुन पिडीत अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ०२ महिने या मुलीसोबत लग्न करून आरोपी याने दिनांक ०१/०६/२०२२ ते दिनांक ३१/०५/२०२३ पर्यंत वारंवार पिडीतेशी शारिरिक संबंध ठेवुन तिला ४ महिन्याची गर्भवती केले आहे.

सदर प्रकरणी पोस्टे गोबरवाही जिल्हा भंडारा येथील अप. क्र. २९०/२३ कलम ३७६ (२) (एन) भादंवी सहकलम ४, ६, ९ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा २०१२ येथुन सदरचा गुन्हा वर्ग होवुन पोस्टे पारशिवनी येथे प्राप्त झाल्याने पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भताने मो. नं. ९५५२८०४३८८ हे करीत आहे.

## घरफोडीचा प्रयत्न

**पोस्टे सावनेर :–** अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा पाटणसांवगी शिक्षक कॉलनी येथे दिनांक २९/०९/२०२३ चे २/०० वा. ते. ६/०० वा दरम्यान फिर्यादी नामे– सौ राजेश्री अंकुश राउत, वय ४२ वर्ष रा. मानेवाडा रोड प्लॉट न. ११६ महात्मा फुले नगर नागपूर हीची आई नामे– उशा युवराज भोयर ही दिनांक १७/०९/२०२३ रोजी दुपारी १४/०० वा. पाटणसांवगी येथून तिचा मुलगा नामे –सतिश युवराज भोयर रा. वसई विरार मुबंई येथे आपले घराला कुलुप लावून गेली असता फिर्यादीचे आईचे बंद घराचे दाराचे कुलुप तोडून घरात प्रवेश करून घरातील लोखंडी आलमारीची तोडफोड करून त्यामधील कपडे जमिनीवर अस्ताव्यस्त फेकुन चोरी करण्याचा प्रयत्न कोणत्यातरी अज्ञात इसमाने केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट व ओ.पी. पाटणसांवगी ऑकरन्स नं. ९८/२३ कलम ४५७, ३८०, ५११ भादवी चा गुन्हा नोंद करून तपासात घेतला. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा. माणीक शेरे ब.न. १८१६ मो.न. ९८२३३६१७८५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**